# अल्पसंख्याक समाजातील मुलींसाठी बांधण्यात आलेली वसतीगृहे

केंद्र तसेच राज्य योजनेंतर्गत अल्पसंख्याक विभागामार्फत परभणी जिल्ह्यात अल्पसंख्याक समाजातील उच्च शिक्षण घेणा-या मुलींकरीता परभणी, गंगाखेड, पाथरी, सेलू, जिंतूर व पूर्णा येथे वसतीगृहे बांधण्यात आलेली आहेत.

प्रत्येक वसतीगृहामध्ये वसतीगृहांतर्गत राहणा-या मुली तसेच कर्मवारी वर्ग यांच्या उपस्थितीची नोंद घेण्यासाठी बायोमॅट्रीक प्रणाली तसेच सुरक्षिततेच्या दृष्टीने सुरक्षारक्षक, सी.सी.टीव्ही यंत्रणा बसविण्यात आलेली आहे. वसतीगृहांतर्गत वास्तव्यास असलेल्या मुलींना जेवण, नाष्टा इ.बाबतचा खर्च स्वत: भागवावा लागतो. सदर मुलींच्या जेवणाची सोय होणेबाबत शासनाकडे मागणी करण्यात आलेली आहे.

वसतीगृहामध्ये प्रवेश घेण्यासाठी ७०% जागा अल्पसंख्याक समाजातील मुलींसाठी राखीव ठेवण्यात आल्या आहेत. तसेच ३०% जागा बिगर अल्पसंख्याक मुलींसाठी शासनाच्या प्रचलित आरक्षानुसार भरण्यात येत आहेत.

सद्यस्थितीमध्ये परभणी जिल्ह्यातील अल्पसंख्याक समाजातील उच्च शिक्षण घेणा-या मुलींकरीता परभणी, गंगाखेड, पाथरी, सेलू व जिंतूर येथील वसतीगृहामध्ये उच्च शिक्षण घेणा-या मुलींची प्रवेशासंदर्भात माहिती खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | वसतीगृहाचे ठिकाण | प्रवेश क्षमता | प्रवेश घेतलेल्या मुलींची संख्या |
|---|---|---|---|
| १ | परभणी, ता. जि.परभणी | ६० | ४७ |
| २ | गंगाखेड,ता.गंगाखेड जि. परभणी | ६० | ३० |
| ३ | पाथरी, ता.पाथरी जि.परभणी | १०० | ४० |
| ४ | सेलू, ता.सेलू जि.परभणी | १०० | ३८ |
| ५ | जिंतूर, ता.जिंतूर जि.परभणी | १०० | ३६ |

तसेच पूर्णा येथील अल्पसंख्याक समाजातील मुलींच्या वसतीगृहाचे बांधकाम जवळपास पुर्णत्वास आल्याने वसतीगृह व्यवस्थापनांतर्ग आवश्यक असलेला निधी शासनामार्फत प्राप्त होताच पुढील शैक्षणिक सत्रात वसतीगृह कार्यान्वित करण्यात येईल व मुलींसाठी प्रवेशप्रक्रिये राबविण्यात येईल.